सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात जाहिरात व प्रसिद्धी योजनेंतर्गत निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक : हातमाग-२०१८/प्र.क्र.१७५/टेक्स-३
नवीन प्रशासन भवन, १४ वा मजला,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ३० मार्च, २०१९

वाचा :

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २ एप्रिल, २०१८
२) शासन पत्र, वित्त विभाग क्र. शासाउ १०.१८/प्र.क्र.४८/सा.उ., दिनांक २० एप्रिल, २०१८
३) संचालक वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कार्या-५(२)/ब-२२२/ १०२९७/२०१८, दिनांक २३ ऑक्टोबर, २०१८
४) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. हातमाग-२०१८/प्र.क्र.१७५/टेक्स-३, दिनांक २५ जानेवारी, २०१९
५) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २५ जानेवारी, २०१९
६) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. हातमाग-२०१८/२४६/प्र.क्र.१०९/ टेक्स-३, दिनांक २९ जानेवारी, २०१९

प्रस्तावना :-

हातमाग उद्योगाच्या विकासाकरीता सूट व इतर अर्थसहाय्य (२८५१ ०११९), २६, जाहिरात व प्रसिध्दी या योजनेखाली महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या., नागपूर यांना रु. ४३९.०० लाख व महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्या. (महाटेक्स), मुंबई यांना रु. १७.७० लाख याप्रमाणे एकूण रु. ४५६.७० लाख इतकी रक्कम उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव संचालक वस्त्रोद्योग, महाराष्ट्र शासन, नागपूर यांनी संदर्भ क्र. ३) दिनांक २३ ऑक्टोबर, २०१८ च्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे. सदर योजनेखाली रु. १५०.०० लाख इतका निधी प्राप्त झाला असून वित्त विभागाच्या संदर्भ क्र. १) येथील दिनांक २ एप्रिल, २०१८ च्या परिपत्रकानुसार ७०% निधी वितरणाच्या मर्यादेत संदर्भ क्र. ४) येथील दिनांक २५ जानेवारी, २०१९ च्या शासन निर्णयान्वये रु. ८०.०० लाख व संदर्भ क्र. ६) येथील दिनांक २९ जानेवारी, २०१९ च्या शासन निर्णयान्वये रु. २५.०० लाख याप्रमाणे एकूण रु. १०५.०० लाख इतका निधी संचालक वस्त्रोद्योग, नागपूर यांना वितरीत करण्यात आला आहे. सदर योजनेखाली सुधारीत अंदाजान्वये रु. १२०.०० लाख इतका निधी प्राप्त झाला असून उर्वरित रु. १५.०० लाख (रु. पंधरा लाख फक्त) इतका निधी संचालक वस्त्रोद्योग, नागपूर यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

हातमाग उद्योगाच्या विकासाकरीता सूट व इतर अर्थसहाय्य (२८५१ ०११९), २६, जाहिरात व प्रसिध्दी या योजनेखाली संचालक वस्त्रोद्योग, वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन, नागपूर यांना सन २०१८-१९ करीता रु. १५.०० लाख (रु. पंधरा लाख फक्त) इतका निधी मंजूर करण्यात येत आहे. सदरचा खर्च विहीत पद्धतीने करावा.

२. सदरचा निधी संचालक वस्त्रोद्योग, नागपूर यांनी महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या., नागपूर व महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्या. (महाटेक्स), मुंबई यांना त्यांच्या मागणीनुसार व आवश्यकतेनुसार वितरीत करावा.

३. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २ एप्रिल, २०१८ सोबतच्या परिशिष्टातील अ.क्र. २ बाबत नमूद करण्यात येते की, योजनेच्या स्वरुपात अथवा व्याप्तीमध्ये बदल होत नसल्याने नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीची आवश्यकता नाही. तसेच परिशिष्टातील अ.क्र. ८ मधील तपासणी सूचीतील मुद्दयांचीही पूर्तता होत आहे.

४. परिच्छेद क्र. ६ क) मध्ये नमूद केल्यानुसार, तसेच सदर परिपत्रकातील परिच्छेद क्र. ६ ब), परिच्छेद ७ मधील (२) व (७) तसेच ८ मधील अटी या प्रकरणी लागू असून त्या अटींची पूर्तता सदर प्रकरणी होत आहे.

५. सदर निधी खालील अटींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

शासकीय विभागाने करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपद्धतीची सुधारीत नियमपुस्तिका उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या क्र. भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/ भाग III / उद्योग-४, दि. १.१२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रसिद्ध केली आहे. सदर शासन निर्णयाच्या तसेच त्यासोबतच्या नियमपुस्तिकेतील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

जाहिरातीवरील खर्च करताना त्यासंबंधीचे वित्तीय अधिकार नियम पुस्तिकेत नमूद वित्तीय अधिकारांचे पालन करण्यात यावे. तसेच जाहिराती संदर्भात शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. मावज-२०१५/प्र.क्र.३२७/३४, दिनांक ६ ऑक्टोबर, २०१५ मध्ये तसेच या संदर्भातील सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ३० मार्च, २०१६ व दिनांक ५ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयात नमूद सूचनांनुसार कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी तथा त्यांचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

ह्या निधीतून खरेदी करण्यात येणाऱ्या साहित्याची देयके प्रत्यक्ष वस्तू प्राप्त झाल्यानंतरच संबंधितांना ECS द्वारे अदा होतील याची दक्षता घ्यावी.

६. प्रमाणित करण्यात येते की, जाहिरात व प्रसिद्धी योजेंतर्गत यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षक/महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत.

७. प्रमाणित करण्यात येते की, सदर निधी स्वीय प्रपंची लेखा अथवा बँक खात्यात जमा न करता खर्च केला जाणार आहे.

८. उपरोक्त प्रयोजनासाठी होणारा खर्च "मागणी क्र. व्ही-२" अंतर्गत '२८५१, ग्रामोद्योग व लघुउद्योग खालील ११०,संमिश्र ग्रामोद्योग व लघुउद्योग आणि सहकारी संस्था, (०२) विविध सहकारी संस्थांना अर्थसहाय्य, (०२)(५०) हातमाग उद्योगाच्या विकासाकरीता सूट व इतर अर्थसहाय्य (राज्य हिस्सा

२५ टक्के) (कार्यक्रम) (२८५१ ०११९), २६, जाहिरात व प्रसिध्दी' या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा व सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षासाठीच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

९. सदर रक्कम जिल्हा कोषागार, नागपूर येथून काढण्यासाठी संचालक वस्त्रोद्योग, वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर यांचे कार्यालयातील सहाय्यक संचालक (लेखा) यांना "आहरण व संवितरण अधिकारी" व संचालक वस्त्रोद्योग, वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर यांना "नियंत्रक अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर रक्कम ज्या प्रयोजनासाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावी.

१०. महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या., नागपूर व महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्या. (महाटेक्स), मुंबई यांनी त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या रकमेचे विनियोग प्रमाणपत्र संचालक वस्त्रोद्योग, नागपूर यांच्यामार्फत शासनास सादर करावे.

११. वरील रकमेचा खर्च विहीत पद्धतीने करण्यात यावा.

१२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं- २०१८/ प्र.क्र.६९/ अर्थ-३, दिनांक २ एप्रिल, २०१८ अन्वये "२६, जाहिरात आणि प्रसिध्दी" या प्रयोजनासाठी प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३३०१५२४०८७५०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

PRAMOD DATTATRAYA TUPE

Digitally signed by PRAMOD DATTATRAYA TUPE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=25fb9d155cb4ae55ebc591d80f2e588a505237544f7c760ae3f32ae952f91058, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=750e3d339fabe697f13347901277e881075dd78c20a924b9acb3b93db44f2d61, ou=CO OPERATION MARKETING AND TEXTILE DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=PRAMOD DATTATRAYA TUPE
Date: 2019.03.30 15:28:38 +05'30'

(प्रमोद द. तुपे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १, मुंबई / महाराष्ट्र - २, नागपूर
२) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र - १, मुंबई / महाराष्ट्र - २, नागपूर
३) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
५) कोषागार अधिकारी, नागपूर
६) संचालक वस्त्रोद्योग, वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर
७) महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या., नागपूर
८) महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्या. (महाटेक्स), मुंबई
९) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
१०) कार्यासन १६-स / १७-स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
११) निवड नस्ती, टेक्स-३ कार्यासन.